REVIEW OF RESEARCH

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 3.8014(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 4 | JANUARY – 2017

# दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील सोलापूर शहरातील हातमाग कामगारांच्या चळवळी



प्रा.अंबादास धर्मा केत
इतिहास व प्रा.भा. इ.सं व पुरातत्त्वशास्त्र विभाग
चां.ता.बोरा महाविद्यालय शिरुर, जि.पुणे.

**प्रस्तावना:**

भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंतच्या काळात मुंबई प्रांतातील आघाडीचे औद्योगिक शहर म्हणून सोलापूर शहराची ख्याती होती. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील द्वीपकल्पीय रेल्वे मार्गाचा विस्तार, स्थानिक हातमाग व्यवसायाची भरभराट आणि कापड गिरण्यांची स्थापना इ. कारणांमुळे सोलापूर शहराला तत्कालीन मुंबई प्रांतातील मुंबई व अहमदाबाद पाठोपाठ तिसऱ्या क्रमाकाचे औद्योगिक केंद्र म्हणून लौकिक प्राप्त झाला. सोलापूरच्या या औद्योगिक उत्क्रांतीत हातमाग उद्योग व कापड गिरण्यांचा मोठा वाटा होता. सोलापूरातील कापड केंद्रीत औद्योगिक क्षेत्रातील कामगारांची संख्याही लक्षणीय होती. १९२१ च्या सुमारास सोलापूर शहरातील १,१९,५०० इतक्या एकूण लोकसंख्येपैकी ६२,००० लोक औद्योगिक क्षेत्रात कार्यरत असून त्यापैकी एकटया कापड उद्योगातील कामगारांची संख्या ५०,००० म्हणजे एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४२ टक्के तर औद्योगिक क्षेत्रातील सर्व कामगारांच्या ८१ टक्के इतकी होती.[१] १९३१ च्या जणगणनेनुसार सोलापूर शहरातील एकूण लोकसंख्येच्या जवळपास ४१ टक्के लोकसंख्या हातमाग उद्योगावर अवलंबून होती.

सोलापूरातील कापड गिरण्या, हातमाग उद्योगातील विणकर कामगार व कापड व्यवसायाशी अनुषंगिक इतर पूरक उद्योगातील कामगारांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभापासूनच आपल्या हक्कांसाठी चळवळी करण्यास सुरुवात केली होती. सोलापूरातील गिरणी कामगारांच्या चळवळींना आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात स्थान मिळालेले असले तरी हातमागासारख्या कुटीरोद्योगात काम करणाऱ्या कामगारांच्या चळवळी तुलनेने दुर्लक्षित राहिल्या. जागतिक मंदीच्या काळात म्हणजेच इ.सन १९३० च्या दशकात स्थानिक गिरणी कामगारांच्या चळवळी व आयटकशी संबंधित लाल बावटा कामगार संघाच्या प्रभावामुळे हातमाग उद्योगातील कामगारांमध्ये जागृती निर्माण झाली. विशेषत: दुसऱ्या महायुध्दाच्या काळातील हातमाग व्यवसायावर आलेल्या गंभीर संकटाच्या परिस्थितीत हातमाग कामगारांनी वेतनवाढ, महागाई, धान्य टंचाई इ. प्रश्नांवर अनेक आंदोलने केली. यातील काही ठळक चळवळींचा वेध प्रस्तुत शोधनिबंधात घेण्यात आला आहे.

## सोलापूरातील हातमाग उद्योग व कामगार वर्गाचा उदय:

मध्ययुगीन काळापासून सोलापूर शहर व परिसरात हातमागावर कापड विणणे हा शेतीच्या खालोखाल दुसऱ्या क्रमाकांचा उद्योग राहिला आहे. या काळातच मोमीन, लिंगायत कोष्टी, निराळी, सणगर, इ. विणकर जमाती या उद्योगात कार्यरत होत्या. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सोलापूर शहरासह वळसंग, वैराग, करकंब इ. ठिकाणे हातमाग कापडाच्या उत्पादनासाठी प्रसिध्दीस आली होती.[२] पेशव्यांच्या काळात सोलापूरात हातमागावर तयार होणारी तलम धोतरे व धोतीचे कापड प्रसिध्द असल्याची माहिती मिळते. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात माधवराव पेशव्यांच्या आज्ञेनुसार सोलापूर शहरात माधवराव किंवा मंगळवार पेठेची स्थापना होऊन शहराचा विस्तार झाला.[३] माधवराव पेशव्यांनी हातमाग व्यवसायाला उत्तेजन दिल्याने शेजारच्या निजाम राज्यातील पद्मशाली, कुरहिनशेट्टी, तोगटवीर, पट्टुसाळी इ. अनेक विणकर जमाती सोलापूरात स्थायिक झाल्या. या स्थलांतरित विणकरांच्या कुशलतेमुळेच सोलापूरातील हातमाग व्यवसायाचा झपाट्याने विस्तार झाला. १८८४ च्या सोलापूर जिल्हा गॅझेटियरनुसार सोलापूरात ६४२५ हातमाग व ४२५० विणकर असल्याची माहिती मिळते. या सुमारास सोलापूरातील हातमागावर सुती व रेशमी साडया, धोती, खाद्या इ. कापडांचे उत्पादन केले जाई. विसाव्या शतकाच्या अगदी सोलापूरात तयार होणाऱ्या पक्क्या रंगातील सुती साडयांनी मध्य प्रांतातील नागपूर, धनवाड व मुंबई प्रांतातील येवल्यासारख्या प्रसिध्द केंद्रातील उत्पादनांपेक्षा सरस असल्याची माहिती मिळते.[४] १९ व्या शतकाच्या अखेरीस सोलापूरातील हातमागाच्या कुटीरोद्योगात कारखाना पध्दतीचा उदय झाला. कारखान्यांच्या उदयाबरोबर व्यक्तिगत विणकाम करणाऱ्या विणकराची जागा कारखान्यातील कामगाराने घेतली. विसाव्या शतकाच्या पहिल्या दोन—तीन दशकात सोलापूरातील हातमाग कारखान्यांची संख्या मोठया प्रमाणावर वाढली. जागतिक स्तरावरील आर्थिक मंदीच्या काळात म्हणजे १९३५—३६ साली सोलापूरात हातमागाचे लहान मोठे १२५५ कारखाने असल्याची माहिती मिळते.[५] दुसऱ्या महायुध्दाच्या काळातच कापड गिरण्या व हातमाग व्यवसायाच्या पाहणीसाठी भारत सरकारने नेमलेल्या सत्यशोधन समितीने आपल्या अहवालात सोलापूर हे मुंबई प्रांतातील हातमाग कारखान्यांचे सर्वात मोठे केंद्र बनल्याची नोंद केली आहे.[६] हातमाग व्यवसायाच्या विस्ताराबरोबर या व्यवसायात कार्यरत असलेल्या कामगारांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. दुसऱ्या महायुध्दाच्या सुरुवातीला सोलापूरात सुमारे १०,००० हातमागांवर सुमारे ३०००० कामगार कार्यरत होते. या काळात सुती साडया हेच प्रमुख उत्पादन असून दररोज पाच ते सहा हजार प्रमाणे महिन्याकाठी एक लाख तीस हजार साडयांचे उत्पादन होत असल्याची माहिती मिळते.[७]

## हातमाग कामगारांमधील जागृती :

सोलापूरातील हातमाग उद्योगात या काळापर्यंत इतर स्थानिक विणकर जमातींच्या तुलनेत पद्मशाली या विणकर जमातीचे वर्चस्व निर्माण झाले होते. या उद्योगातील मोठे कारखानदार, आसामी म्हणजे कंत्राटी किंवा छोटे कारखानदार व विणकर कामगार या तिन्ही वर्गात या समाजातील लोकांची संख्या सर्वाधिक होती. साहजिकच पद्मशाली समाजातून कामगारांचे नेतृत्व विकसित झाले. १९३६ सालीच पद्मशाली विणकर समाजातील नागप्पा नारा नावाच्या कॉंग्रेस पुढाऱ्या ने सोलापूर हातमाग कामगार संघाची स्थापना केली. कारखानदारांविरुध्द संघर्ष करण्यापेक्षा कामगारांचे प्रश्न सामंजस्याने सोडविण्यावर या कामगार संघाचा अधिक भर असल्याने या संघाच्या पुढाऱ्या ंनी संप व आक्रमक चळवळींचा मार्ग अवलंबल्याचे दिसत नाही.[८] याच काळात सोलापूरच्या गिरणी कामगार चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या भाई सरदेसाई, क—हाडकर, साने इ. अभिजात समाजवादी नेत्यांच्या संपर्कामुळे विणकर समाजातील सिद्रामप्पा फलमारी, विठ्ठल फलमारी, व्यंकप्पा मडूर इ.कार्यकर्ते आयटक प्रणीत लाल बावटयाच्या कामगार चळवळीकडे आकर्षित झाले. १९३६ साली या कार्यकर्त्यांनी पद्मशाली समाज सेवा मंडळाची स्थापना करुन या मंडळाच्या माध्यमातून हातमाग कामगारांचे

संघटन व त्यांच्या हक्कांसाठी लढाऊ भूमिका घेण्यास सुरुवात केली. १९४० साली या कार्यकर्त्यांच्या पुढाकारातून लाल बावटा हातमाग कामगार युनियनची स्थापना झाल्यानंतर कामगार चळवळीला गती मिळाली.[९] लाल बावटयाच्या नेतृत्वाखालील हातमाग कामगारांनी महायुध्दापूर्वीच सोलापूरातील हातमाग कामगारांनी सरकारने कारखानदारांना नियमित व योग्य दरात सूत पुरवठा करावा, हातमाग कामगारांना फॅक्टरी कायदा लागू करावा, वेतन वाढ मिळावी, इ.प्रश्नांवर आंदोलने केली होती.

## दुसऱ्या महायुध्दाचा हातमाग धंद्यावरील परिणाम:

१९३९ साली युरोपात दुसऱ्या महायुध्दाला सुरुवात झाल्यानंतर पहिल्या महायुध्दाप्रमाणे बाजारभाव वाढीची अपेक्षा करणाऱ्या सोलापूरातील हातमाग कारखानदारांचा भ्रमनिरास झाला. युरोपातील युध्दाचा परिणाम म्हणून स्थानिक हातमागास लागणारा सूत, रंग, आर्ट सिल्क इ. कच्च्या मालाच्या किंमती भरमसाठ वाढल्या. युध्दाच्या सुरुवातीपासून युरोपातून येणाऱ्या रंगाच्या किंमतीत चारपट तर जपानमधून येणाऱ्या आर्ट सिल्कची किंमत तिपटीने वाढली. बाजारातील या स्थितीचा गैरफायदा घेत सूत व्यापाऱ्यांनी सूताच्या भावात भरमसाठ वाढ केल्याने देशी सुताच्या किंमतीत १०० टक्के तर परदेशातून येणाऱ्या रेशीम व रंगाच्या भावात २०० टक्क्यांची भाववाढ झाली. दुसऱ्या बाजूला कच्च्या मालाच्या तुलनेत तयार लुगडयांच्या किंमतीत वाढ न झाल्याने कारखाने बंद राहिल्यामुळे कामगारांवर बेकारी व उपासमारीचे संकट निर्माण झाले.[१०] महायुध्दाच्या संकटाबरोबरच याच काळात सोलापूर नगरपालिकेने स्थानिक हातमाग कारखान्यांच्या जागांवर फॅक्टरी कायद्याप्रमाणे तिप्पट करवाढ करण्याचा आदेश काढल्यामुळे हातमाग उत्पादक जेरीस आले होते.[११] त्यातच दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरीस कोल्हापूर, सांगली, मिरज, हैद्राबाद इ. संस्थांनात कापड निर्यातीवर सरकारने बंदी घातल्यामुळे सोलापूरच्या हातमाग उद्योगात अभूतपूर्व संकट निर्माण झाल्याने कामगारांची बेकारीत वाढ झाली होती.[१२] व्यवसायातील या संकटांचा गंभीर परिणाम या क्षेत्रातील हजारो कामगारांवर झाल्याने युध्दकाळातच कामगारांनी अनेक आंदोलने केली.

## भाववाढीच्या विरोधातील आंदोलन:

महायुध्दामुळे हातमाग उद्योगावरील संकटाबरोबरच जीवनावश्यक वस्तूंच्या बाजार भावातील दुप्पट वाढीचा फटका सोलापूरातील कापड गिरण्यांतील कामगारांसह हातमाग कामगारांनाही बसला. या काळात एका बाजूला धान्य व इतर जीवनावश्यक मालाच्या किंमती भरमसाठ वाढत होत्या तर दुसऱ्या बाजूला कच्च्या मालाच्या भाववाढीमुळे कारखानदारांसह कामगारांची परिस्थिती दयनीय झाली होती.[१३] विशेषत: या काळातील सुताच्या भरमसाठ भाव वाढीमुळे हातमाग व्यवसायावर मंदीची अभूतपूर्व छाया पसरली होती. सरकारने महागाईवर नियंत्रण घालावे या मागणीसाठी लाल बावटा संघाने १३ डिसेंबर, १९३९ रोजी हातमाग कामगारांच्या नियमित सभांचे ठिकाण असलेल्या लाकडाच्या बाजारात कॉम्रेड सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली सभा आयोजित केली. सुमारे ७००० कामगारांची उपस्थिती असलेल्या या सभेत हातमाग कामगारांनी सोलापूरात सुरु झालेल्या गिरणी कामगारांच्या संपाला पाठिंबा दिला. या सभेतील विठ्ठलराव फलमारी, कॉ.जी. डी.साने, मिनाक्षीताई कऱ्हाडकर नागप्पा नारा, भाई छन्नुसिंह चंदेले, एम.डी.विभुते इ. सर्वच वक्त्यांनी रंग, किराणा इ. मालावरील वाढलेली किंमत कमी करावी व नफेबाजीला आळा घालावा अशी जोरदार मागणी केली. सभा संपल्यानंतर हातमाग कामगारांनी शहराच्या प्रमुख रस्त्यांवरुन मिरवणूक काढून ''नफेबाजीवर नियंत्रण घाला, नफेबाजांना शिक्षा करा'' अशा मजकूराचे फलक हाती घेऊन घोषणा दिल्या.[१४] शहरातील मजूर मैदानावर (सध्याचे पार्क मैदान) मिरवणूक विसर्जित करण्यात आली. हातमाग कामगारांच्या या मिरवणुकीमुळे कामगारांसह सोलापूरातील सर्वसामान्य नागरिकांमध्येही महागाईच्या प्रश्नावर मोठया प्रमाणावर जागृती झाली.

## सुताच्या दरावर नियंत्रण घालण्याच्या मागणीसाठी लढा :

या काळातील सोलापूरच्या हातमाग कामगार चळवळींचे वैशिष्टय म्हणजे हातमाग धंद्यातील संकटावर उपाययोजनांची मागणी करण्यासाठी कामगारांनी हातमाग कारखानदारांच्या साथीने चळवळी उभारल्या. युद्धकालीन सूत टंचाईमुळे शहरातील हातमागाच्या छोटया—मोठया कारखानदारांवर उत्पादन बंद ठेवण्याची पाळी आली होती.[१५] या संकटातून बाहेर पडण्यासाठी लाल बावटा कामगार संघाच्या पुढाऱ्यांनी आसामी म्हणजे छोटया कारखानदारांना सोबत घेत संयुक्त चळवळ उभी केली. कॉ. विठ्ठलराव फलमारी, कॉ. व्यंकप्पा मडूर यांच्यासह आसामी वर्गातील रामय्या साकीनाल, रामचंद्र येमूल, सायण्णा कट्टा, अंजनीय्या ताटी, चंद्रय्या लगशेट्टी यांच्या संयुक्त समितीने दहा हजार कामगारांचा मोर्चा कलेक्टर कचेरीवर नेला. तत्कालीन ब्रिटीश कलेक्टर कोरीन यांनी कामगार व कारखानदारांच्या मागण्यांचा सहानुभूतीने विचार करुन शहरातील कापड गिरण्यांना हातमागवाल्यांना नियंत्रित भावाने सूत पुरवठा करण्यास भाग पाडले.[१६] गिरण्यांतून मिळणारे सूत हातमाग उत्पादकांमध्ये वाटप करण्यासाठी संयुक्त सूत वाटप समितीची स्थापना करण्यात आली. या निर्णयामुळे शहरातील हातमाग व्यवसायावरील संकटाची तीव्रता काही प्रमाणात कमी होण्यास मदत झाली. मात्र, युध्दाच्या मध्यात पुन्हा एकदा सूत टंचाईने हातमाग उत्पादक हैराण झाले. परिणामी सप्टेंबर १९४४ मध्ये पुन्हा एकदा सोलापूरातील कारखानदारांचा हातमाग आसामी संघ व लाल बावटा कामगार संघाने संयुक्तपणे आंदोलन उभारुन मुंबई सरकारच्या टेक्सटाईल आयुक्तांना निवेदन देऊन सोलापूरातील हातमागांना नियंत्रित भावाने पुरेसा सूत पुरवठा करण्याची मागणी केली. या दोन्ही संघटनांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे सोलापूरातील सुताचा काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे शक्य झाले होते.[१७]

## तंबाखू भत्त्यातील वाढीच्या मागणीसाठी संप :

सोलापूरातील हातमाग कारखानदार आपल्या कारखान्यातील कामगारांना दर आठवडयाला पगाराबरोबर तंबाखू भत्त्यापोटी काही रक्कम देत असत.[१८] मार्च, १९४० मध्ये तंबाखू भत्त्यात वाढ करण्याच्या मागणीसाठी हातमाग कामगारांनी पुकारलेल्या संपाला हिंसक वळण लागले. संपातील कामगारांना रोखण्यासाठी पोलीसांनी दहा हातमाग कामगारांना अटक करुन खटला भरला. सुमारे बारा दिवस प्रभाव असलेल्या या संपकाळात पोलीसांना सोलापूर शहराच्या काही भागात कडक बंदोबस्त ठेवावा लागला होता. पद्मशाली विणकर समााजातील एक मान्यवर पुढारी आषण्णा इराबत्ती यांच्या मध्यस्थीने कामगार व मालक यांच्यात तडजोड होऊन संप मिटविण्यात आला. २ एप्रिल, १९४० रोजी लाकडाच्या बाजारात विठ्ठलराव फलमारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कामगारांच्या सभेत मडूर, बोमडयाल, इराबत्ती यांची भाषणे झाली, यावेळी संप मागे घेण्याची घोषणा करतानाच लाल बावटा संघाने कामगारांवरील खटले काढून घेण्याची मागणी करणारा ठरावही संमत केला होता.[१९]

## १९४० सालचा मजुरी वाढीसाठी संघर्ष :

१९४० साली सोलापूरातील प्रसिद्ध आशण्णा अच्चुगुटला नावाच्या कारखानदाराच्या कारखान्यातील अच्चुगुटला वाण (या कारखान्यात तयार होणारी रेशमी पदराची इरकल साडी) विणणाऱ्या विणकरांनी मजुरी वाढीसाठी संप पुकारला. या संपाच्या काळात बेकार कामगारांसाठी लाल बावटा संघाच्या कामगारांनी तेलुगू लोककथांच्या माध्यमातून धान्य व पैसा जमा करुन कामगारांची उपासमार टाळण्याचा प्रयत्न केला. शेवटी कारखानदाराने लाल बावटयाच्या पुढाऱ्यांशी तडजोड करुन कामगारांना दर तिवाटीमागे (तिवाटी म्हणजे चार लुगडयांचा संच) १२ आण्यांची वाढ दिली.[२०] याचवेळी कामगारांत फूट पाडण्यासाठी मालकाने कॉंग्रेसप्रणित तिरंगी झेंडा कामगार संघाशी करार करुन एक रुपयाची वाढ जाहीर केली. परस्पर विरोधी करारांमुळे कामगारात गोंधळाची स्थिती निर्माण झाली. यावेळी लाल बावटयाच्या कामगारांनी चार आणे जास्तीची वाढ नाकारुन

आपल्या संघाच्या निर्णयाला पाठिंबा दिला होता. यावरुन सोलापूरातील हातमाग कामगारांमध्ये कॉंग्रेस विचारांच्या कामगार संघटनेपेक्षा कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील लाल बावटा कामगार संघाच्या कॉम्रेड सिद्रामप्पा फलमारी, कॉम्रेड व्यंकप्पा मडूर इ. कामगार पुढाऱ्यांचा मोठा प्रभाव असल्याचे दिसून येते.

### धान्याच्या भाववाढी विरोधी लढा :

इ.सन १९४१ च्या सुमारास शहरातील तीस हजार हातमाग कामगारांसह कारखानदारांनाही सूताची भाव वाढ, अपुरा धान्य पुरवठा इ. अडचणींचा सामना करावा लागला. मागे उल्लेख केल्याप्रमाणे हातमाग उद्योगातील अशा समान संकटाच्या काळात हातमाग कामगारांच्या चळवळींत कारखानदार, व सर्वपक्षीय पुढारी सहभागी होऊन संयुक्त बैठका घेत असत. इ.सन १९४२ साली लाल बावटयाच्या कामगारांनी धान्य टंचाईच्या विरोधात सुरु केलेल्या आंदोलनाची तीव्रता वाढविण्यासाठी कॉ. फलमारी, मडूर व सिलगारी यांनी ७ डिसेंबर, १९४२ रोजी भद्रावती पेठेत शहरातील कारखानदार, सर्वपक्षीय पुढारी व कामगार नेत्यांची संयुक्त सभा आयोजित केली. जवळपास चार हजार कामगारांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेने धान्याची टंचाई कमी करण्यासाठी नगरपालिकेने जास्त धान्य दुकाने उघडावीत, सरकारने धान्यसाठा स्वत:कडे घेऊन जनतेस मोफत पुरवठा करावा इ. ठराव संमत करण्यात आले होते.[२१]

### रेशनिंगच्या गैरसोयी विरोधी आंदोलन:

महायुद्धाच्या काळात अनंत अडचणींमुळे हातमाग व्यवसाय संकटात सापडला होता तर दुसऱ्या बाजूला रेशनिंगमधील धान्य टंचाई व इतर समस्यांमुळे कामगारांची हलाखी वाढत होती. लाल बावटयाच्या कामगार पुढाऱ्यांनी याकाळात ठिकठिकाणी सभा घेऊन सरकारने कामगारांच्या समस्यांवर उपाययोजना करण्याची मागणी केली. १० जून, १९४४ रोजी मल्लप्पा सिलगारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत विठ्ठलराव फलमारी, व्यंकप्पा मडूर, रामय्या सोमा, महंमद ईस्माइल इ. कामगार पुढाऱ्यांनी कामगारांच्या मागण्या आक्रमकपणे मांडल्या. व्यंकप्पा मडूर यांनी ''लालबावटा हातमाग कामगार युनियनतर्फे भरलेली ही सभा रेशनिंगच्या बाबतीत शहराच्या पूर्व भागात चालू असलेल्या गोंधळाकडे सरकारचे आणि रेशनिंग कमिटीचे लक्ष वेधू इच्छिते.'' असा ठराव मांडला.[२२] शहराच्या पूर्व भागात तेलुगू भाषिक कामगारांची संख्या अधिक असल्याने रेशनिंगमध्ये तेलुगू जाणणाऱ्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, परगावाहून नव्याने आलेल्या विणकर कामगारांना ताबडतोब तात्पुरते रेशनिंग कार्डे द्यावीत, हंगामी कामगारांना कार्ड मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर कराव्यात, तसेच या भागातील गिरणी कामगारांच्या रेशन कार्डाच्या समस्या सोडवाव्यात, रेशनिंगमधील कार्डे कुटुंबातील सदस्य संख्येनुसार वाढवून द्यावीत आणि रॉकेल व धान्य वाटपासंबंधी कार्डे काढण्याची प्रक्रिया सुरु करावी इ. मागण्यांचा या ठरावात समावेश होता.

महायुद्धाच्या अखेरच्या काळात सरकारने शहरातील कापड निर्यातीस घातलेल्या बंदीच्या विरोधात लाल बावटा हातमाग कामगार संघाने सभा व मोर्चे काढून आंदोलन केले. २६ जुलै रोजी मोठया मिरवणुकीसह शहरातील गड्डा मैदानावर आयोजित केलेल्या कामगारांच्या विराट सभेत कॉम्रेड मडूर, विठ्ठलराव फलमारी इ. नेत्यांनी सरकारच्या धोरणावर टीका केली. तसचे सरकारने बंदी हुकूम मागे न घेतल्यास कामगारांत प्रचंड बेकरी व असंतोष माजेल असा इशारा देऊन तात्काळ निर्यातबंदी उठविण्याची मागणी केली. सोलापूरातील हातमाग कामगारांध्ये लालबावटयाच्या कामगार संघटनेचाच सर्वाधिक प्रभाव असला तरी दुसऱ्या महायुध्दाच्या अखेरच्या काळात कॉंग्रेस विचारांच्या राष्ट्रीय हातमाग कामगार संघानेही कामगार सेवा व कामगारांसाठी विधायक कार्याच्या माध्यमातून हातमाग कामगारांना आपलेसे करण्याचा प्रयत्न सुरु केला होता.[२३] मात्र, असे असले तरी सोलापूरातील हातमाग कामगारांच्या पुढील काळातील चळवळीतही लाल बावटा कामगार संघाचीच भूमिका महत्त्वाची राहिल्याचे दिसून येते.

**संदर्भ व तळटीपा :**

१. मॅथ्सन एम.सिसाईल, **इंडियन इंडस्ट्री एस्टरडे टुडे अॅन्ड टुमॉरो, अॅपेंडेक्स २, रिपोर्ट ऑन इकॉनॉमिक स्टेटस ऑफ वुमेन वर्किंग इन शोलापूर मिल्स,** ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९३० पृ.

२. कॅम्पबेल जेम्स. एम. (संपा.), **गॅझेटियर ऑफ दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, शोलापूर डिस्ट्रिक्ट,** (ओरिजनली प्रिंटेड इन १८८४) दि गर्व्हनमेंट फोटो झिंको प्रेस, पुणे, १९९७, पु. २७०

३. पोतदार द.वा (संपा.), **ऐतिहासिक संकीर्ण साहित्य, खंड ३,** भारत इतिहास संशोधक मंडळ स्वीय ग्रंथमाला क्रं. ५४, पुणे, १९४१, पृ. ६३–६६

४. साप्ताहिक सोलापूर समाचार, **सोलापूरची औद्योगिक स्थिती,** संपादकीय लेख, १४ नोव्हेंबर, १९०५, पृ. २

५. सोलापूर हातमाग विणकर व्यापारी संघाने १९३५–३६ साली केलेल्या अधिकृत मोजणीनुसार शहरातील छोटया–मोठया कारखान्यांची संख्या १२५५ इतकी होती. अधिक तपशीलासाठी पहा : **दैनिक सोलापूर समाचार, ११ जानेवारी, १९३९,** पृ. २ व ३

६. **रिपोर्ट ऑफ दि फॅक्ट फायडिंग कमिटी (हॅन्डलूम अॅन्ड मिल्स**), गव्हर्नमेंट ऑफ इंडिया प्रेस, कलकत्ता, १९४२, पृ. ७५–७७

७. दैनिक सोलापूर समाचार, ''**हातमाग धंद्यावरील संकट ताबडतोब इलाजाची गरज** '' संपादकीय लेख, २ ऑगस्ट, १९४१ पृ. २

८. पंधे एम.के, **लेबर आर्गनायझेशन इन शोलापूर सिटी**, अनपब्लिश्च्चड पीएच.डी. थिसिस सबमिटेड टू युनिव्हर्सिटी ऑफ पुना, १९६०, पृ. ७२

९. मडूर व्यंकप्पा (संपा.), **कै.कॉम्रेड सिद्रामप्पा फलमारी स्मृती स्मरणिका,** आयटक कामगार केंद्र सोलापूर, **याशिवाय पहा पंधे पृ. ८५–८६**

१०. दैनिक सोलापूर समाचार, ''**फाजील नफेबाजीला आळा घालून हातमाग धंद्याला संरक्षण द्या'' हातमाग कामगारांची सभा**, बातमी, २१ ऑगस्ट, १९४१, पृ.२.

११. दैनिक सोलापूर समाचार, **सोलापूर हातमाग विणकर वर्गास इशारा,** बातमी ३ आगस्ट, १९४० पृ. ४

१२. दैनिक सोलापूर समाचार, **सोलापूरातील हातमाग धंद्यावर आर्थिक संकट,** बातमी, १६ सप्टेंबर, १९४५, पृ. २

१३. दैनिक सोलापूर समाचार, ''**विणकर वर्गाची वेदना व्यक्त करण्याला कोणतेही साधन नाही** '' सायण्णा दिकोंडा यांचे पत्रक, १६ ऑगस्ट, १९४१, पृ. २

१४. दैनिक सोलापूर समाचार, ''**सोलापूरात बाजारभाव नियंत्रणाची मागणी : हातमाग कामगारांची प्रचंड मिरवणूक व सभा** '' बातमी, १४ डिसेंबर, १९३९, पृ. २

१५. पंधे एम.के, पूर्वोक्त., पृ. ३९–४०

१६. नल्ला दामोदर (संपा.), **साप्ताहिक पद्मशाली वार्ता, हातमाग विशेषांक**, सोलापूर, ७ ऑगस्ट, १९८७, पृ. ८

१७. पंधे एम. के, पूर्वोक्त, पृ. ८७

१८. व्यंकटरामण के.एस, **इकॉनॉमिक कंडिशन ऑफ हॅन्डलूम वीव्हर्स,** जर्नल ऑफ दि युनिव्हर्सिटी ऑफ बॉम्बे, बॉम्बे, जुलै, १९४२, पृ. १०९

१९. दैनिक सोलापूर समाचार, ४ एप्रिल, १९४०, पृ. २ वरील बातमी.

२०. जक्कन मधुकर (संपा.), **पूर्वेचा लाल तारा–कॉम्रेड व्यंकप्पा मडूर स्मृती स्मरणिका**, प्रजा नाटय मंडळ, सोलापूर, २०१०, पृ. १३–१४

२१. दैनिक सोलापूर समाचार, **पूर्व भागात धान्य पुरवठयाची प्रचंड जाहीर सभा–दोन ठराव संमत,** बातमी, ८ डिसेंबर, १९४२, पृ. ३

२२. दैनिक सोलापूर समाचार, **हातमाग कामगारांची सभा, रेशनिंगच्या तक्रारी दूर करण्यासंबंधीचा ठराव,** बातमी, १३ जून १९४४ पृ. १
२३. दैनिक सोलापूर समाचार, **राष्ट्रीय हातमाग कामगार संघाचे पत्रक,** १० जुलै, १९४५, पृ. ३